# पुढे गेले त्यांचा शोधित मारग । चला जाऊ माग घेत त्यांचा ॥

साम्ययोग : दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक १७३] सेवाग्राम, सोमवार ता. १ जून १९६४ [मूल्य ५ न. पै.

## पंडितजी लोकदेव होते

### विनोबाजींची पंडितजींना भावपूर्ण श्रध्दांजलि

माझ्या बंधूनो,

काल मला काहीच कल्पना नव्हती आणि कुणालाहि नव्हती. मी दुपारी निजलो होतो त्यावेळी आमच्या लोकांनी रेडिओवर बातमी ऐकली आणि मी जागा झाल्यावर मला ती बातमी सांगितली.

पंडितजी राष्ट्रनेता होते. आणि लोकनेता होते. असे दोन्ही प्रकारचे नेतृत्व एका माणसात एकत्र झालेले क्वचित पहायला सांपडते. त्याशिवाय ते एका बाजूने राष्ट्र पुरूष होते तर दुसऱ्या बाजूने विश्व मानव होते. आणि दोन्हीमध्ये आमच्या राष्ट्राचे हित आणि सबंध विश्वाचे हित एकच आहे, दोन्हींचा विरोध असू शकत नाही, असा त्यांचा विश्वास होता आणि या विश्वासावर ते काम करीत होते. आता हे काम आपल्याला चालवावयाचे आहे. **पुढे गेले त्यांचा शोधित मारग । चला जाऊ माग घेत त्यांचा ॥** आम्हाला आता हिंमतीने पाऊले टाकायची आहेत.

आपले राष्ट्र विशाल आहे. या राष्ट्राचा राष्ट्रवाद सुद्धा जागतिक वादच ठरतो. भारत अंतरराष्ट्रीय राष्ट्र असल्या सारखेच आहे. चौदा, पंधरा भाषा अेकत्र आहेत, पांच सहा धर्म एकत्र आहेत, दुनियाभरातून आलेल्या असंख्य मानव जाति एक कुटुंबात जमा झालेल्या आहेत. इतकी विविधता या देशात आहे. असा आपला हा प्राचीन, पुरातन देश आपण एकत्र राखला आहे, तेव्हा आपली जबाबदारी फार मोठी आहे. आता या भारतात तुकाराम महाराज म्हणतात त्या प्रमाणे **"मंगलावाचुनि उमटेना वाणी"** (आंसू) किंवा रामदासानी म्हटले त्याप्रमाणे, **"सर्वा मुखी मंगल बोलवावे"** मंगल शब्दच सर्वांच्या मुखातून निघाला पाहिजे. भेद सर्व लोपोत, हृदये जोडली जावोत तर भारतामध्ये एवढी शक्ती आहे की, सबंध विश्वाला शांति ची दिशा भारत देऊ शकेल. अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक जाति आम्हाला एकत्र नांदवायच्या आहेत.

एवढ्या मोठ्या देशात लहान मोठे वाद असणारच. पण त्या वादातून समान अंश काढायचा, त्यांचा समन्वय करायचा, मेळ साधायचा, हे सर्व काम आपल्याला करायचे आहे. पंडितजी त्यासाठी सारखे झटत होते, त्यांचे चित्त विश्वाएवढे व्यापक होते. न कोण्या प्रांताचा अभिमान, न एकाद्या भाषेचा आग्रह, न कोण्या धर्म–पंथाशी (आंसू) चिताचे संबंध. जगात कुठेहि गेले तरी जो लोक समूह त्यांच्या समोर उभा रहात असे, त्याला पाहून त्यांच्या चित्तात भावाला भेटून जसा भावाला आनंद होत असे. (आंसू) उपनिषदात म्हटले आहे, **"मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यो देवोभव, अतिथिदेवोभव"**, त्या भाषेत बोलायचे तर पंडितजी लोकदेव होते. लोकच त्यांचा देव होता. आणि लोकांना पाहून त्याचे हृदय उचंबळून येत असे. असा मनुष्य देह सोडून गेला तर कुठे जाईल ? तो "लोकात्मा" होईल, (आंसू) लोकातच राहील.

लोक हृदय जोडण्याचे काम तुम्ही आम्ही खेड्यापाड्याचे लोक आणि नगराचे नागरिक कशा रीतीने करीत आहोत ते पहायला ते वारंवार आमच्यामध्ये येतील. आम्हाला सोडून ते गेले नाहीत. एका देहाने सगळ्यामध्ये जायला वेळ मिळेलच असे नाही. ही त्यांची अडचण दूर करण्यासाठी भगवंताने त्यांना विदेह रूप दिले आहे. अलीकडून तिकडे जाण्याची साधने तीव्र झाली आहेत. तथापि सर्वांच्यामध्ये सतत मिसळावे, सर्वांशी सतत संपर्क राखावा हे, साधने कितीहि तीव्र झाली तरी देह असे पर्यंत जुळणार नाही. त्या अडचणीतून ते मुक्त झाले आहेत. आणि आता तुमची आमची परीक्षा आहे.

#### ग्रामदान हृदयाला जोडणारे काम

मला आमच्या लोकानी विचारले की, पदयात्रेच्या कार्यक्रमात काही फरक करायचा कां ? तेव्हा मी सांगितले की जो ठरलेला कार्यक्रम आहे तो पार पाडायचा आणि हे ग्रामदानाचे कार्य, गावातील लोक प्रेमाने रहातील, भेद सर्व विसरून जातील, एकट्याला दुःख भोगू देणार नाहीत असे हे हृदयांना जोडण्याचे काम आहे, ते दुप्पट नेटाने चालवले पाहिजे. आणि माझ्या मित्रांनो, खेडेगावाची इतकी मंडळी आहात, खेडी आहेतच प्रेमासाठी वसलेली म्हणून ग्रामदानाचा संदेश तुम्ही शीघ्र उचला. प्रत्येक खेडे ग्रामदानाचा नमुना होऊ दे म्हणजे हिंदुस्तानचे स्वराज्य बलवान होईल आणि त्याच्या बरोबरच विश्व-शांति हि बळकट होईल.

---

## धमनीचा रक्तस्त्राव हे मृत्यूचे कारण

नवी दिल्ली ता. २८

हृदयातून निघणाऱ्या मुख्य धमनीतून रक्तस्त्राव होणे हे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूचे मुख्य कारण आहे असे आज येथे जाहीर करण्यात आले.

"हृदयविकाराचा झटका आणि धक्का यानंतर मृत्यु आला," अशा आशयाच्या माहितीखेरीज त्यांच्या मृत्युविषयी कोणत्याहि प्रकारची औपचारिक घोषणा करण्यात आली नाही.

काल सकाळी त्यांनी छातीत दुःखत असल्याचे सांगितले परंतु त्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. त्यांच्या घरांतील मंडळीमध्ये जी चर्चा आहे, तीवरून असे दिसते की, छातीतील दुखणे तीव्र होण्यापूर्वी त्यांनी दाढी केली होती आणि डॉक्टरांना बोलविण्यात आले होते. त्यानंतर लागलीच ते बेशुद्ध झाले नंतर ते पुन्हा शुद्धीवर आलेच नाहीत.

* * *

## निसर्गालाहि रडूं कोसळले !

स्व. पं. नेहरूचे अंत्यदर्शन घेण्यास उत्सुक झालेला जनसमुदाय प्रक्षुब्ध झाल्यामुळे अधिक लोकांना दर्शन घेता यावे म्हणून पं. नेहरूंचा पार्थिव देह मोकळ्या जागी आणण्यासाठी हलविण्यात आला आणि त्याच सुमारास आकाशातून पावसाची झिमझिमहि सुरू झाली. काल सायंकाळी ६ वाजेपासून पाऊस सुरू असतांनाहि लोक शांतपणे रांगेत जाऊन अंत्यदर्शन घेत होते. काही त्यांच्या पायावर डोके ठेवीत तर काही हात जोडून नमस्कार करीत.

* * *

## हीरालाल बागवानाचे अहोभाग्य

नवी दिल्ली, ता. २८ (प्रे, ट्र.)

गेल्या एक तपापासून पंडितजींच्या कोटावर खोचण्यासाठी रोज सकाळ सायंकाळ नियमाने त्यांना गुलाबाची टवटवीत फुले आणून देणारा त्यांचा बागवान हीरालाल काल रात्रभर पंडितजींच्या शवाजवळ बसून होता.

तो म्हणाला "पंडितजींना फुलांचे अतिशय वेड होते जेव्हा मी त्यांना फुले नेऊन देत असे तेव्हा ते माझ्याकडे अतिशय स्नहार्द दृष्टीने पाहत असत."

* *

## धरणी मातेलाहि कंप सुटला

नवी दिल्ली. ता. २८

आज सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी पं. नेहरूची अंत्ययात्रा सुरू होण्यापूर्वी सुमारे एक तास अगोदर येथे भूकंपाचा सौम्य हादरा बसला. तो काही सेकंद जाणवला. आपला लाडका जवाहर स्वर्गवासी झाला म्हणून शोकावेग असह्य झाल्यामुळे धरणीमातेलाहि कंप सुटला म्हणायचा !

* * *

# भारताच्या सहस्रावधि वर्षांच्या प्राचीन संस्कृतीतून साकार झालेले व्यक्तिमत्व

## पूर्व पाकी वृत्तपत्रांची पं. नेहरूंना श्रद्धांजलि

डाका ता. २८ (प्रे. ट्र.) पू. पाकिस्तानांतील बारापैकी बाराहि वृत्तपत्रांनी आज पं. नेहरू यांच्या मृत्यूची बातमी मोठमोठाले मथळे देऊन प्रसिद्ध केली. प्रत्येक वृत्तपत्राचा अग्रलेख पं. नेहरूवरच लिहिला गेला होता.

प्रचंड प्रमाणात खप असलेल्या 'इत्तफाक' या दैनिकाने लिहिलेल्या दोन स्तंभी अग्रलेखांत म्हटलेआहे, "एतद्कालीन जागतिक इतिहासावर या महान पुरुषाचा काय परिणाम झालेला आहे. याचे विश्लेषण करण्याकरिता शब्द पुरेसे नाहीत. पं. नेहरू हे एका देशाचे किंवा एका युगाचे नाहीत. त्यांनी इतिहास घडविला आहे आणि ते इतिहासात अमर होऊन राहतील."

आंतरराष्ट्रीय राजकारणा नव्या कल्पनांचा प्रादुर्भाव करण्याव्यतिरिक्त त्यांच्या बाबतीत दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे [illegible] ज्वलंत आंतरराष्ट्रीय [illegible] विण्याच्या बाबतीत त्यांनी वास्तववादी हातभार लावलेला आहे, असे सांगून हे वृत्तपत्र पुढे म्हणते, 'तटस्थतावादाची कल्पना पं. नेहरू यांनीच शोधून काढली. सत्तागटांनी विभागलेल्या आणि अण्वस्त्राच्या धोक्याची भीति असलेल्या या जगात ते जागतिक शांततेकरिता झटले. साम्राज्यवाद आणि वसाहतवाद यांच्याविरुद्ध पं. नेहरूंनी धर्मयुद्ध पुकारले होते. आफ्रो–आशियाई एकतेच्या ध्येयाचा त्यांनी सतत पुरस्कार केला.

प्राचीन भारताच्या हजारो वर्षांइतक्या जुन्या संस्कृतींतून साकार झालेले त्यांचे व्यक्तित्व संपूर्ण जगताशी समरस झाले होते. एका विशिष्ट देशाचे नागरिक असूनहि ते जगाचे होते. आधुनिक भारताचे ते श्रेष्ठ मुत्सद्दी होते. ते आधुनिक काळांतील सर्वांत थोर विचारवंत आणि मानव जातीविषयी प्रेम बाळगणारे होते. त्यांच्या मृत्युमुळे सपूर्ण जगाची हानि झालेली आहे."

'पाकिस्तान ऑब्झर्वर' या वृत्तपत्राने म्हटले आहे, संघर्ष कमी करणारा त्यांचा प्रभाव जर नसता तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अधिक बिघडले असते. यामुळेच खरोखरी या क्षणी आमची अंत:करणे दु:खाने आणि गोंधळाने भरून आलेलो आहेत."

* *

### दुखवटयाचे संदेश

पंतप्रधान नेहरूंच्या निधना निमित्त खालील देशाकडून शोक संदेश आले आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन, इंग्लंडच्या महाराणी एलिझाबेद, ब्रह्म देशाचे अध्यक्ष नेवीन, टांगानिकाचे अध्यक्ष न्यारेरे, न्यूझिलंडचे पंतप्रधान किथ होल्योके, स्वीडनचे पंतप्रधान टागे एरलंडर, इटालीचे परराष्ट्रीय मंत्री सरागत, सुदानचे अध्यक्ष अबाऊड, आस्ट्रेलियाचे पंतप्रधान सररावर्ट मेन्झीझ, वेस्ट जर्मनीचे माजी चॅन्सेलर ऑडनेवर, सिकोम चे मुख्य सचिव ग्यालसेन, जपानचे पंतप्रधान इकेडा, इजिप्तचे अध्यक्ष नासेर, घानाचे अध्यक्ष डॉ. नक्रुमा, फ्रान्सचे डिगॉल, नेपालचे पंतप्रधान तुलसी गीरी, पाकिस्तानचे परराष्ट्रीय मंत्री भुट्टो, चीनचे पंतप्रधान चाऊएन लाय अल्जेरियाचे अध्यक्ष श्री. बेन बेला, आस्ट्रीयाचे अध्यक्ष डॉ. अडोले, केनियाचे पंतप्रधान केन्याटा, अरब लीगचे सचिव अबदेल खलेक हासौना, सिरियाचे पंतप्रधान बिटर, इंग्लंडचे पंतप्रधान सर ह्यूम, युगास्लोव्हाकियाचे पंतप्रधान पेटर स्टंबोलिक, व अध्यक्ष टिटो मलाशियाचे पंत प्रधान टंकु अबदुलरहमान, इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकर्णो, पूर्व जर्मनीचे अध्यक्ष ल्युबके, फिलीपाईन्सचे अध्यक्ष मॅकपागल, झेगोस्लाव्हा कियाचे अध्यक्ष नोव्होटनी, युगांडाचे पंतप्रधान आबोटे, कॅनडाचे पंतप्रधान पिअरसन, कंबोडिआचे सिहनुक,

* *

# या दुःखद प्रसंगी सर्व मतभेद विसरून जाऊ या

## पाकचे परराष्ट्र मंत्री श्री. भुत्तो याचे उद्गार

### भुट्टो यांच्या विमानांतून अब्दुल्ला यांचे आगमन

नवी दिल्ली ता. २८

पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री श्री. भुत्तो व शेख अब्दुल्ला एका खास विमानाने दिल्ली येथे येऊन पोचले. सरदार स्वर्णसिंग त्यांना सामोरे गेले होते. विमानातून उतरतांच भुत्तो म्हणाले, आम्हालाहि फार दु:ख होत आहे. भारतीय जनतेच्या दु:खात पाकिस्तानची जनताहि सामील आहे.

श्री. भुत्तो पुढे म्हणाले, अशा प्रसंगी मतभेद विसरून भारत व पाकिस्तान यातील जनता परस्परांच्या खांद्याला खांदा लावून या दु:खद प्रसंगातून पार पडेल.

शेख अब्दुल्ला म्हणाले, या प्रसंगी दु:खाश्रुशिवाय अर्पण करण्यासारखे मजजवळ काहीहि नाही. याच विमानाने बेगम इफ्तिकारुद्दान व त्यांचे पुत्र अरिफहि येथे येऊन पोहोचले.

* *

## इतिहास त्यांचे सदैव स्मरण

### अमेरिकाध्यक्ष श्री. जॉन्सन यांचा शोकसंदेश

नवी दिल्ली, ता. २७ (प्रे. ट्र.)

"नेहरूंनी आपल्या शब्दांनी आणि कृतींनी आपल्या देशाला आणि संपूर्ण मानवजातोला अमाप असे दिलेले आहे. पण आज त्यांच्या मृत्यूने त्याचा देश आणि मानवजात आज त्यापासून वंचित झाली आहे अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. जॉन्सन यांनी श्रीमति इंदिरा गांधी यांना पाठविलेल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

ते म्हणतात आम्ही जेम्हा नुकतेच भेटलो होतो तेव्हा अशा प्रकारच्या शोकांतिकेने आमची फारकत होईल असे आम्हांस वाटले नव्हते. आपल्या वडिलांच्या मृत्युमुळे माझे जे व्यक्तिगत नुकसान झाले आहे त्याबद्दल मला किती वाईट वाटत आहे हे मी शब्दांनी व्यक्त करू शकत नाही.

पंतप्रधान नेहरूंशी माझा जो काही थोडासाच संबंध आला त्याची आठवण मी एक अमूल्य ठेवा म्हणून जतन करून ठेवोन. प्रे. केनेडी यांच्या हत्येच्या वेळी त्यांनी आमचे ज्या प्रकारे सांत्वन केले त्यामुळे मला दु:ख सोसण्यास एक प्रकारचे सामर्थ्य लाभले. आमच्या राष्ट्रीय हानिनंतर असा एक अद्वितीय पुरुष नाहीसा व्हावा याचे आम्हास इतके दु:ख होत आहे की त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

आपल्या पित्याच्या निधनामुळे आपल्याला किती दु:ख होत असेल हे मला ठाऊक आहे. त्यांना भारतास अजून कितीतरी द्यावयाचे हाते. तथापि पं. नेहरूंनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात जी भूमिका बजावली तिचे इतिहास सदैव स्मरण ठेवील. अतिशय आणिबाणीच्या काळी ह्यांचे चातुर्य आणि नेतृत्व अनिवार्यपणे आवश्यक होते. शांततेच्या मार्गावर जगाची वाटचाल सुरू करण्यासाठीहि इतिहास पं. नेहरूंच्या नेतृत्वाची नोंद करील' –असेहि ते शेवटी म्हणाले

* *

## आधुनिक भारताचा शककर्ता गेला !

### निजामाचे श्रीमती गांधींना पत्र

हैदराबाद, दि. २७

श्री. नेहरूंच्या मृत्यूने एक थोर देशभक्त आणि भारताचा शककर्ता पुरुष नाहीसा झाला, असे हैदराबादच्या निजामाने श्रीमती इंदिरा गांधी यांना पाठविलेल्या पत्रांत म्हटले आहे.

राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन ह्यांनाहि पत्र पाठवून पंतप्रधानांच्या आकस्मिक मृत्यूने आपल्याला धक्काच बसला असे म्हटले आहे.

त्यांचे नातू मुकर्रमजहा हे पंतप्रधानांच्या अत्ययात्रेत निझामांचे प्रतिनिधि म्हणून हजर राहतील.

संपादक : श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक : श्री. वसंतराव बोंबटकर
मुद्रक : श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व : महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.



विनोबा वार्ता सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)

श्री. स-४४. आचार्य विनोबा प०सर्वोदय कार्यालय
कारण मार्फत आर्वी
वर्धा